**अहमदनगर महानगरपालिका,अहमदनगर.**
**मा.स्थायी समिती  विशेष सभा क्रमांक- ७**

नगरसचिव कार्यालय
दिनांक :- १३/०८/२०१४

प्रति,
मा. --------------------------------------

स्थायी समिती, सदस्य
अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर..

**महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९मधील अनुसुची "ड" प्रकरण २ नियम ३(क) अन्वये** अहमदनगर महानगरपालिकेच्या **स्थायी समिती विशेष सभा क्र-७ गुरूवार दि.१४/०८/२०१४रोजी दुपारी १२.३०वाजता** महानगरपालिका नवीन प्रशासकीय इमारत, औरंगाबाद रोड येथील मा.स्थायी समिती सभागृहात खालील विषयावर विचार-विनीमय करण्यासाठी  बोलविण्यांत आलेली आहे.

तरी सदर सभेत आपण उपस्थित रहावे हि विनंती.

सही /-
प्र. नगरसचिव,
मा.सभापती साहेब यांच्या आदेशान्वये. अहमदनगर महानगरपालिका.

**गुरूवार  दिनांक- १४/०८ /२०१४ ची विषय पत्रिका.**

| **विषय क्र.** | **विषय सुची** |
|---|---|
| ७५ | अहमदनगर महानगरपालिका शहर हद्दीत व हद्दीबाहेर BOO तत्वावर अहमदनगर महानगरपालिका परिवहन उपक्रम सुरू करणेकरिता अभिकर्ता संस्था नेमणेबाबतचा ऑफिस रिपोर्ट. |

सही /-
प्र.नगरसचिव,
अहमदनगर महानगरपालिका

**सोबत-** १. विषय क्रमांक- ७५ च्या  टिपणीच्या  व प्रस्तावाच्या  झेरॉक्स प्रती
२.मा. महासभा ठराव क्र. १० दिनांक ०५/०७/२०१४
३. प्रारूप करारनामा मसुदा

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**
**मा. स्थायी समिती विशेष सभा क्रमांक- ७**

विषय क्रमांक- ७५ गुरूवार दि.१४/८/२०१४

ठराव क्रमांक- ७५ गुरूवार दि.१४/८/२०१४

**प्रस्तावाचा विषय :-** अहमदनगर महानगरपालिका शहर हद्दीत व हद्दीबाहेर BOO तत्वावर अहमदनगर महानगरपालिका परिवहन उपक्रम सुरू करणेकरिता अभिकर्ता संस्था नेमणेबाबतचा ऑफिस रिपोर्ट.

**प्रस्तावाचा मजकूर :-** अहमदनगर महानगरपालिका पाणी पुरवठा विभाग

संदर्भ- ई निविदा क्र. ७१९

उपरोक्त विषयास अनुसरून विनंती रिपोर्ट सादर की, अहमदनगर महानगरपालिका शहर हद्दीत व हद्दीबाहेर BOO तत्वावर अहमदनगर महानगरपालिका परिवहन उपक्रम सुरू करणे करिता अभिकर्ता संस्था नेमणेकामी ई निविदा क्र. ७१९ च्या प्राप्त तांत्रिक लिफाफा क्र. १ मध्ये तीन निविदा प्राप्त झालेल्या आहेत.

१) यशवंत ऑटो प्रा.लि. , अहमदनगर
२) रोहन एस. मांडे, अहमदनगर
३) के. जी. पी. कन्स्ट्रक्शन, अहमदनगर

उपरोक्त तीनही निविदा मा.उपायुक्त (कर) यांचे दालनात दि. १३/०८/२०१४ रोजी मा.सभापती तथा उपायुक्त, मु.ले.प. मु.ले.अ, मेकॅनिकल इंजिनिअर तसेच निविदाधारक यांचे उपस्थित व्यापारी लिफाफा उघडण्यात आला. त्यानुसार तीन निविदाधारकांनी महानगरपालिकेस स्वामीत्वधन देणे बाबत खालीलप्रमाणे दर सादर केलेले आहेत.

| | | | |
|---|---|---|---|
| १) के. जी. पी. कन्स्ट्रक्शन, अहमदनगर | प्रति बस प्रति वर्ष | - | रू. ८४००/- प्रमाणे |
| २) रोहन एस. मांडे, अहमदनगर | प्रति बस प्रति वर्ष | - | रू. ७२०० प्रमाणे |
| ३) यशवंत ऑटो प्रा.लि. , अहमदनगर | प्रति बस प्रति वर्ष | - | रू. १०००/- प्रमाणे |

वरीलप्रमाणे निविदाधारकांचे स्वामित्वधन देणे बाबतचे दर पाहता म.न.पा. चा आर्थिक फायदा करणेच्या दृष्टीकोनातून संबधीतांशी समक्ष वाटाघाटी करण्यात आल्या. प्रथमतः जादाचे निविदाधारक मे. के.जी.पी. कन्स्ट्रक्शन, अहमदनगर यांचे जास्तीत जास्त दर रू. ८४००/- प्रति बस प्रति वर्ष असल्याने त्यांचेशी वाटाघाटी करण्यात आल्या. परंतू त्यांनी दर वाढविण्यास असमर्थतता दर्शविली. तद्नंतर क्र. २ चे निविदाधारक मे. रोहन एस.मांडे, अहमदनगर यांना विचारणा करण्यात आली असता त्यांनीही दर वाढविण्यास असमर्थता दर्शविली. तद्नंतर तीसरे निविदाधारक मे. यशवंत ऑटो प्रा.लि. अहमदनगर यांचेशी वाटाघाटी केली असता त्यांनी त्यांचे दर रू. १०००/- हे प्रति बस प्रति माह असे भरलेले असून प्रति वर्षा करिता सदरचे दर रूपये १२०००/- प्रति वर्ष प्रति बस असे राहतील असे नमूद केले. यावेळी क्र. १ व क्र. २ चे निविदाधारक अनुक्रमे के.जी.पी. कन्स्ट्रक्शन व रोहन मांडे यांनी मे. यशवंत ऑटो प्रा.लि. यांचेशी वाटाघाटी करणेस हरकत नसल्याचे सांगितले. व तसे लेखी दिले.

प्रति बस प्रति वर्ष याबाबतचे दर यशवंत ऑटो प्रा.लि. यांचे जादाचे ठरल्याने उक्त कामी मे. यशवंत ऑटो प्रा.लि. अहमदनगर यांची नेमणूक करणेस हरकत नसल्याचे मत मा. छाननी समितीने दिलेले आहे.

तरी मे. यशवंत ऑटो प्रा.लि. यांचे दर प्रति बस प्रति वर्ष हे दर जास्तीचे म्हणजेच रू. १२०००/- प्रति बस प्रति वर्ष असल्याने त्यांची नेमणूक करणेस सदरचा प्रस्ताव मा.स्थायी समितीकडे पाठविणेस मान्यतेस्तव सादर. / **अ**

येणेप्रमाणे मोटार व्हेईकल क्लार्क यांचा अहवाल असे.

यावर मेकॅनिकल इंजिनिअर यांचा अभिप्राय की, दर वाटाघाटीत मे. यशवंत ऑटो प्रा.लि. यांनी दर वाढवून दिल्याने शहर बस वाहतूक चालविणेकामी मे. यशवंत ऑटो प्रा.लि. यांची नेमणूक करणेस हरकत नाही. सदरचा प्रस्ताव अंतिम मान्यतेसाठी मा.स्थायी समितीकडे सादर करणे योग्य मान्यतेस्तव सादर.

यावर मा.उपायुक्त साहेब यांचा अभिप्राय की, विभागाने प्रस्तावीत केल्यानूसार व नमूद **"अ"** प्रमाणे प्रस्ताव मे. स्थायी समिती सभेत सादर करणेबाबत उचित आदेशार्थ सविनय सादर.

यावर मा.आयुक्त साहेब यांचा अभिप्राय की, मा. छाननी समितीचे इतिवृत्त व तुलनात्मक तक्ता यांचे अवलोकन केले. त्यानुसार मे. स्थायी समितीचे मान्यतेस सादर करणेत यावे.

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.

--**--

**चर्चा :-**

मा.सभापती साहेब :- अहमदनगर महानगरपालिका शहर हद्दीत व हद्दीबाहेर BOO तत्वावर अहमदनगर महानगरपालिका परिवहन उपक्रम सुरू करणेकरिता अभिकर्ता संस्था नेमणे प्रस्ताव विषयी आहे.

मा.श्री. सचिन जाधव :- ऑफिस रिपोर्ट वाचून दाखवावा.

त्याप्रमाणे ऑफिस रिपोर्ट सभेमध्ये वाचून दाखविण्यात आले.

मा.श्री. बाळासाहेब बोराटे :- पहिला जो ठेकेदार पर्पल वाला करारनामा भंग करून गेला आहे. त्याच्यावर काय कारवाई करण्यात आली.

मेकॅ.इंजि. श्री. निकम :- सुरवातीला कायदेशीर नोटीस दिली त्यास त्यांनी उत्तर दिले आहे. आपल्या वकीलांना सविस्तर अहवाल सादर केला आहे. परंतू दरम्यानच्या काळात वकीलाची अदलाबदल झाल्याने कार्यवाही झालेले नाही. मा.न्यायालयात कॅव्हेट दाखल करून ठेवण्यात आले आहे.

मा.श्री. बाळासाहेब बोराटे :- बससेवा सुरू होत आहे म्हणून कारवाई थांबवून मागील ठेकेदाराची बँक गॅरंटी कशी रिलीज झाली.

मेकॅ.इंजि. श्री. निकम :- आपल्याकडून रिलीज झालेले नाही गाडयांना NOC देवू नये यासाठी आर.टी.ओ. यांना पत्र देण्यात आले आहे.लवाद संदर्भात मा. प्रधान सचिव यांना पत्र दिले आहे.

मा.सभापती साहेब :- आपल्याकडे बँक गॅरंटी जमा करून घ्या.

मुख्यलेखाअधिकारी श्री. विसपुते :- बँक गॅरंटी रिलीज करू नये या संदर्भात बँकेला आज पत्र देण्यात येईल.

मा.श्री. बाळासाहेब बोराटे :- करारनामा वाचून दाखवा.

मेकॅ.इंजि. श्री. निकम :- प्रारूप करारनामा मनपाचे कायदेशीर सल्लागार यांचेकडून तपासून घेण्यात आला आहे. त्यात काही बदल करावयाचा असेल तर या सभेत करता येतील करारनाम्यातील प्रमुख बाबी वाचुन दाखवितो.

मा.श्री. बाळासाहेब बोराटे :- ॲग्रीमेट १० वर्षाचे केले आहे. मा. शासनाने नवीन बस खरेदीस मंजुरी दिली तर हा करारनामा संपुष्टात येईल याचा करारनाम्यात उल्लेख करावा.

मा.श्री. सचिन जाधव :- ५ ते ६ वर्षापुर्वी आपण रूपये १० लाख बँक गॅरटी घेतलेली आहे. यावेळी किमान रू.२५ लाखाची बँक गॅरंटी घेण्यात यावी. प्रोजेक्ट मोठा आहे अजून काही खर्च झाला तर सोईचे राहील.

मा.सभापती साहेब :- दायित्व मनपाचे काहीच नाही.

मा.श्री. अजिंक्य बारेकर :- ऑफिस रिपोर्ट काय सांगतो.

मेकॅ.इंजि. श्री. निकम :- ऑफिस रिपोर्टमध्ये रू.१० लाखाची बँक गॅरंटी नमूद केलेली आहे.

मा.सभापती साहेब :- पर्यटनाला चालन देण्यासाठी एक बस शनिवार, रविवारी नगरकरांसाठी उपलब्ध करून दयावी. गाडी कोठे थांबवणार कोणते स्थळ दाखणार याबाबत मेकॅ.इंजिनिअर , ठेकेदार यांनी एकत्र बसून निर्णय घ्यावा. वृत्तपत्रांत त्यास प्रसिध्दी देण्यांत यावी. तिकीटाचा दर अल्प राहील याचा विचार व्हावा.गणपती उत्सवामध्ये बस उपलब्ध करून देणे तसेच नवरात्रात केडगाव, बुन्हाणनगर व बोल्हेगांव रेणुकामाता येथे जाण्यासाठी बस ठेकेदाराने रात्री १०ते १२वाजेपर्यत उपलब्ध करून दयाव्यात

मा.श्री. सचिन जाधव :- ७ नंबर अटीमध्ये CCTV चा उल्लेख केलेला आहे ते कोठे बसविणार.

मेकॅ.इंजि. श्री. निकम :- बसमध्ये बसविणार आहे.

मा.उपायुक्त श्री. बेहेरे :- बाब क्र.९ "अपघात" यामधील मजकूर याबाबत महानगरपालिकेत कोणतेही प्रतिपूर्ती अनुज्ञेय असणार नाही याऐवजी याबाबत महानगरपालिकेकडून कोणतीही प्रतिपूर्ती अनुज्ञेय असणार नाही. अशी दुरूस्ती करण्यात यावी.

मा.सभापती साहेब :- जर नागरिकांनी मागणी केली, नगरसेवकांनी मागणी केली. अशा वेळी ठेकेदारा यांनी स्थायी समितीच्या मान्यतेने त्यामार्गावर बस चालू करावी.

मा.श्री. सचिन जाधव :- आपण त्यांना नाममात्र जागा भाडे म्हणजे किती भाडे दयायचे

मेकॅ.इंजि. श्री. निकम :- आपण भाडे देणार नाही.

मा.सभापती साहेब :- आपण अभिकर्त्याला जागा दाखवा जर त्यांना ती जागा पसंत नसेल तर त्यांना स्वतःची जी जागा वापरावयाची असेल तर त्याचे कुठलेही भाडे मनपा त्याला देणार नाही फक्त परवानगी देण्यात यावी.

मा.श्री. सचिन जाधव :- अट क्र.१२ मध्ये जागाभाडे अभिकर्ता संस्थेस दयावे लागेल असे स्पष्ट नमूद करण्यात यावे. अट क्र.१४ मधील पॅरा आपण टेंडर मध्ये नमूद केले होते का ?

मा.उपायुक्त श्री. बेहेरे :- टेंडरमध्ये नमूद केले आहे.

मा.श्री.सचिव जाधव :- रू. ५ लाख तूट देणार ते किती बसेला देणार, ५ बसपेक्षा कमी बस चालविल्या तर रू. ५ लाख देण्यात येवू नये. दरमहा रू.५ लाख मोठी रक्कम होते.

मा.सभापती साहेब :-कमीत कमी १५ ते ३० बस चालविल्या तरच तुट देण्यात येईल.

मा.श्री. सचिन जाधव :- यामध्ये अजून तूट वाढवावयाची असेल तर त्याने ती आताच वाढवावी. त्यासाठी ३० बसेसच्या पेक्षा जास्त बसेसची सेवा दिली तर एवढी तूट वाढवून देण्यात येईल असा स्पष्ट उल्लेख करण्यात यावा. करारनाम्यातील तुटीबाबतचा हा मुद्दा नेहमी उपस्थित होतो. पाहणीत जर त्याने जर एखाद्या महिन्यात कमी बस चालविल्याचे आढळुन आले तर तर त्यास तूटीची रक्कम देण्यात येवु नये.बससेवा बस दुरुस्तीच्या नावाखाली कमी बस कार्यरत ठेवल्या व बस दुरुस्तीसाठी असतील अशा

परिस्थीतीत नागरिकांना बससेवेचा लाभ मिळणार नाही निर्मलनगर,केडगावा येथे अंतर्गत भागामध्ये रिक्षा जात नाहीत.अशा ठिकाणच्या नागरिकांना आपण बससेवेचा लाभ देवु शकत नाही त्यामुळे अशापरिस्थीत तुट देण्यात येवु नये बजेटमध्ये स्वतंत्र हेड सुरु करण्यात यावे.

मा.श्री. बाळासाहेब बारोटे :- ५ गाडया चालवल्या तर एवढे १० गाडया चालवल्या तर एवढे असे प्रपोरशनेट करून देण्यात यावे.

मा.सभापती साहेब :- बसेस बनवायला वेळ लागणार आहे त्याला वेळ दयावा लागणार आहे. बसेस उपलब्ध होईपर्यत त्याला होणारा तोटा दयावा लागणार आहे.

मा.श्री. सचिव जाधव :- अभिकर्त्याला याठिकाणी चर्चेसाठी बोलविण्यात यावे. त्याचे म्हणणे जर असेल जर नसेल तर आपण का देतो.

मा.सभापती साहेब :- ठेकेदारास कमीत कमी  नवीन तीन महिने बस बसविणेसाठी  लागतील. उदया १५ ऑगस्ट रोजी फक्त ५ गाडया सुरू कराव्यात. पुढील बसेस करीता तीन महिन्याची त्याला वेळ दया. यावेळी आपण तूट देण्याची आर्थिक तरतूद केली आहे. त्यामुळे आता मागील वेळेसारखा मुद्दा उपस्थित होणार नाही.

मा.श्री.सचिन जाधव :- ज्या ठिकाणी अभिकर्त्याला नुकसान होणार नाही अशाच मार्गांवर तो बस चालविल व ज्या रूट वर नुकसान होईल त्या रूटवर चालवणार नाही. म्हणून जर त्याने कमी गर्दीच्या पण नागरिकांच्या सेवेच्या रूटवर बस चालवल्या तरच त्यास नुकसान भरपाई देण्याबाबत विचार व्हावा.जर फक्त जास्त उत्पन्नाच्या रूटवर बस चालविल्यातर देउ नये. इतर रूटवर बस चालवणे त्याला बंधनकारक करावे.

मा.श्री.अजिंक्य बोरकर :- तोटा ठरविण्यासाठी अधिका-यांची नेमणूक करावी. तो तपासणी करून फायदा किंवा तोटा ठरवील.

मा.सभापती साहेब :- अभित्र्यास पुढील बसेस उपलब्ध करून देण्यास वेळ द्यावा लागेल.

मा.श्री.सचिन जाधव :- तीन महिन्यांनंतर वीस ते तीस बस जर धावल्या तरच तोटा रक्कम देण्यात येईल असा करारनाम्यात समावेश करण्यात यावा.

मा.श्री.बाळासाहेब बोराटे :- ठेकेदाराची जर बस सेवा चालविण्याची मानसीकता असेल तर द्यायला हरकत नाही. सदस्यांनी उपस्थित केलेल्या मुद्दयांबाबत चर्चा व खुलासा करण्याकरीता या ठिकाणी बोलावण्यात यावे.

<u>अट क्र.१५ वाचन केले .</u>

मा.श्री.बाळासाहेब बोराटे :- अभिकर्त्या च्या बससवेवर देखरेख करण्याकरीता समिती नेमा.

मेकॅ.इंजि.श्री.निकम :- अट क्र.१६ मध्ये तशी तरतुद केली आहे.

मा.श्री.बाळासाहेब बोराटे :- समितीमध्ये पदाधिकारी घेण्यात यावेत.

मा.सभापती साहेब :- समितीमध्ये मा.उपायुक्त, मा.मुख्यलेखापरीक्षक, मा.मुख्यलेखाधिकारी, मेकॅ.इंजीनियर, मा.महापौर,मा.उपमहापौर, मा.स्थायी समिती सभापती व विरोधी पक्ष नेता इ.चा समावेश करण्यात यावा.

मुद्दा क्र.१७ पासून पुढे वाचन सुरू करण्यात आले.

मा.सभापती साहेब व मा.बाळासाहेब बोराटे :- स्थायी समितीचा ठराव झाल्यावर २४ तासात करारनामा करण्यात यावा.

मा.उपायुक्त श्री.बेहेरे :- स्थायी समितीचा ठराव झाल्यानंतर १५ दिवसांच्या आत करारनामा करून द्यावा याऐवजी २४ तासांच्या आत करारनामा करून द्यावा लागेल असे अटीत समाविष्ट करावे. इतर विभागांची परवानगी घेण्याची जबाबदारी अभिकर्त्याची आहे.

मा.सभापती साहेब :- करारनामा लवकरात लवकर करून देण्यात यावा असा उल्लेख करावा. अट क्र १९ मध्ये प्रधान सचिव ऐवजी महासभेकडे दाद मागावी अशी सुधारणा करण्यात यावी.तसेच अट क्र.२० मध्ये लवादा बाबत मा.सचिव,नगरविकास विभाग यांचे कडे ऐवजी मा.महासभेकडे दाद मागता येईल अशी सुधारणा करण्यात यावी.

मा.श्री.सचिन जाधव :- २० ते ३० बस किती दिवसांत धावतील

अभिकर्ता :- तीन महिन्यात धावतील .

मा.श्री.सचिन जाधव :- ज्यावेळी २० बसेस रस्त्यावर धावतील त्यावेळी ५लाखांपर्यंत तोटा भरून द्यावा असे आमचे मत आहे.

अभिकर्ता :- २० ते३० बसेस चालविल्यावर आपण रू.५ लाख पेक्षा जास्त तोटा भरून देणार का.

मा.सभापती साहेब :- टेंडर प्रसिध्द करताना आपण १५ ते ३० बसेस असेच नमूद केले आहे.

अभिकर्ता :- आम्ही आमची भूमिका मांडलेली आहे.

मा.श्री. सचिन जाधव :- समजा तूमच्या ५ च बसेस धावल्या तर काय केले पाहिजे.

अभिकर्ता :- तीन महिन्याची मुदत घेत आहेत.

मा.श्री.सचिन जाधव :- उदया १० च बस धावल्या तर भरपाई दिले पाहिजे का ?

अभिकर्ता :- होय.

मा.श्री.अजिंक्य बोरकर :- गाडया रिपेअरींग साठी मुदत दया त्याने मनपास सूचना दयावी.

मा.श्री.बाळासाहेब बोराटे :- १५ बस धावल्या तरच रू.५लाख दया. १० बस चालल्या तर रू. ५ लाख देवू नये. १० बस चालल्या तर रेशोच्या प्रमाणात तूट देण्यात यावी.

मा.श्री.अजिंक्य बोरकर :- ऑफिस रिपोर्ट मंजूर करावा व सदस्यांनी सुचविलेल्या प्रमाणे करारनाम्यात सुधारणा करण्यात याव्यात.

मा.श्री.बाळासाहेब बोराटे :- ऑफिस रिपोर्ट मंजूर करावा व सदस्यांनी सुचविलेल्या प्रमाणे करारनाम्यात सुधारणा करण्यात याव्यात.

मा.सभापती साहेब :- शहर बससेवे संदर्भात चर्चा होत असताना सदस्यांनी ज्या सूचना केल्या त्याची नोंद घ्या. पुर्वानुभव लक्षात घेता अभिकर्त्यास बससेवा सुरू असताना तोटा होण्याची शक्यता आहे. त्याकरिता मा.महासभेच्या ठरावानुसार रू.५ लाख ची तरतूद करण्यात आली आहे. परंतू रू.५ लाख देताना अभिकर्ता संस्थेने किमान १५ ते ३० बसेस चालविणे क्रमप्राप्त आहे. १५ पेक्षा कमी प्रमाणात बस उपलब्ध झाल्यास त्या प्रमाणात तोटा ठरवून देण्याचा ठराव करण्यात यावा. मागील ठेकेदार हा

बाहेरगावचा असल्याने बससेवेच्या अडी अडचणी चर्चा ही होत नव्हती मागील वेळी तोटा भरपाई ची तरतूद नसल्याने आपण त्यांना तोटा भरपाई वाढवून दिली नव्हती. यावेळी तरतूद केली असल्याने तोटा देवून चालविण्यास मंजूरी देण्यात येत आहे. ज्या सूचना केल्या त्याची नोंद घेवून कार्यवाही करण्यात यावी. गणेशोत्सव तसेच नवरात्रोत्सवात केडगाव, बु-हाणनगर,रेणूकामाता एम.आय.डी.सी येथे बसेस उपलब्ध करण्यात याव्यात.दर शनिवार, रविवार नगरदर्शन करीता बस सेवा ठेवावी.

चांगली सेवा त्यांनी दयावी अशी ठेकेदारांना विनंती करतो.

बस सेवा सुरू करण्याबाबत मा.महापौर यांनी जातीने जे प्रयत्न केले त्याबध्दल त्यांचे धन्यवाद व आभार व्यक्त करण्यात येत आहेत.

**ठराव :-** ऑफीस रिपोर्ट व समिती सभागृहात झालेल्या चर्चेनुसार जादाचे निविदाकार मे.यशवंत ऑटो प्रा.लि.अहमदनगर यांची निविदा मंजूर करण्यात येत आहे.

करारनामा करताना पुढील मुद्दे त्यामध्ये समाविष्ट करावेत.

१. प्रारूप करारनाम्यामधील मुद्दा क्र.३ मध्ये पुढील प्रमाणे सुधारणा करण्यात यावी. - जर अहमदनगर महानगरपालिकेने मा.केंद्र शासन व मा.राज्य शासन यांच्या योजनेतून शहर बस वाहतूक उपक्रम राबविल्यास हा करार संपुष्टात येईल. याबाबत अभिकर्ता संस्थेस मा.न्यायालयात दाद मागता येणार नाही, अथवा महानगरपालिकेकडून कोणतेही दायित्व स्विकारले जाणार नाही.
२. प्रारूप करारनाम्यामधील मुद्दा क्र.४ मध्ये पुढील प्रमाणे सुधारणा करण्यात यावी. - अभिकर्त्यांने महानगरपालिकेस रू.१०००/- प्रती बस प्रती महिना द्यावेत.
३. प्रारूप करारनाम्यामधील मुद्दा क्र.५ मध्ये पुढील प्रमाणे सुधारणा करण्यात यावी. - बँक गॅरंटीच्या रकमेवर कोणतेही व्याज देय राहणार नाही.
४. प्रारूप करारनाम्यामधील मुद्दा क्र.७ मध्ये पुढील प्रमाणे सुधारणा करण्यात यावी. - अभिकर्ता संस्थेने १५ ते ३० बसेस उपलब्ध करून देण्यात याव्यात. बसेस सर्वसाधारण पणे सकाळी ५ ते रात्री १२ वाजेपर्यंत चालवाव्यात. दर शनिवार व रविवार नगर दर्शन बस उपलब्ध करून देण्यात यावी. गणेशोत्सव काळात बसेस मध्य रात्रीपर्यंत चालविण्यात याव्यात, तसेच नवरात्रोत्सवात केडगाव , बु-हाणनगर,रेणूकामाता एम.आय.डी.सी. करीता बस सेवा उपलब्ध करण्यात यावी.
५. प्रारूप करारनाम्यामधील मुद्दा क्र.११ मध्ये पुढील प्रमाणे सुधारणा करण्यात यावी. - मा.स्थायी समितीच्या मान्यतेने नवीन मार्गास परवानगी देण्यात येईल.
६. प्रारूप करारनाम्यामधील मुद्दा क्र.१२ मध्ये पुढील प्रमाणे सुधारणा करण्यात यावी. - अभिकर्ता संस्थेने वाहनतळासाठी स्वत:ची अथवा खाजगी जागा भाडयाने वापरल्यास त्यापोटी महानगरपालिकेकडून कोणतीही रक्कम / भाडे दिले जाणार नाही.
७. प्रारूप करारनाम्यामधील मुद्दा क्र.१४ मध्ये पुढील प्रमाणे सुधारणा करण्यात यावी. - अभिकर्ता संस्थेने किमान १५ ते ३० बसेस वापरल्या तरच त्यांना रू.५ लाख देय असतील. जर अभिकर्ता संस्थेने १५ पेक्षा कमी बसेस वापरल्या तर त्या प्रमाणात देय रक्कम कमी होईल. (१५ बसेस साठी रू. ५ लाख तर क्ष बसेस साठी किती या सुत्रानुसार )

८. प्रारूप करारनाम्यामधील मुद्दा क्र.१६ मध्ये पुढील प्रमाणे सुधारणा करण्यात यावी. - शहर बस सेवे बाबत देखरेख समिती गठीत करण्यात यावी. यामध्ये मा.आयुक्त,मा.उपायुक्त कर, मुख्य लेखापरिक्षक, मुख्य लेखाधिकारी, मेकॅनिकल इंजीनियर. यांचा समावेश असेल.

९. प्रारूप करारनाम्यामधील मुद्दा क्र.१८ मध्ये पुढील प्रमाणे सुधारणा करण्यात यावी. - अभिकर्त्याने त्यांना कळविल्यानंतर रक्कम रू.५०० च्या स्टँप पेपरवर स्वखर्चाने करारनामा करून द्यावा. करारनाम्याचा कमाल कालावधी १० वर्षा चा राहील.

१०. प्रारूप करारनाम्यामधील मुद्दा क्र.१९ व २० मध्ये पुढील प्रमाणे सुधारणा करण्यात यावी. - यात मा.प्रधान सचिव / सचिव, नगरविकास विभाग ऐवजी मा.महासभेकडे असे नमुद करावे.

११. प्रारूप करारनाम्यामधील मुद्दा क्र.२१ मध्ये पुढील प्रमाणे सुधारणा करण्यात यावी. - दंडनीय आकार रू.१०००/- प्रती दिन प्रती बस आकारण्यात यावा.

नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यांत यावी.

सुचक :- मा.श्री. अजिंक्य बोरकर सही /-

अनुमोदक :- मा.श्री. बाळासाहेब बोराटे सही /-

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही /-
सभापती,
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका